NEP
COMPLIANT

# शिक्षक मार्गदर्शिका




ज्ञानदीप मिटवी अज्ञान

समग्र शिक्षा

सन २०२३-२४

# प्रस्तावना

शिक्षकांना जादुई पिटाऱ्यामधील संसाधनांचा प्रभावी व पुरेपूर वापर करता यावा यासाठी ही मार्गदर्शिका तयार करण्यात आली आहे. ३ ते ६ या वयोगटातील मुले त्यांच्या सभोवतालच्या भौतिक आणि सामाजिक जगाशी सर्वात प्रभावीपणे संवाद साधतात आणि त्यात सक्रियपणे गुंतून शिकतात. मुलांना अनेक प्रकारे शिकायला आवडतं. जसे, खेळण्यांसोबत खेळणे, धावणे आणि उडी मारणे, साहित्य हाताळणे, बोलणे, ऐकणे, चित्रकला आणि रेखाचित्र, गाणे, नृत्य आणि अभिनय इत्यादी. यासाठी अध्यापन-शिक्षण साहित्य (TLM) काळजीपूर्वक निवडणे महत्त्वाचे आहे.

या मार्गदर्शिकेत दिलेल्या विविध कृती NCF-FS व NIPUN भारत मधील वयोगट ३ ते ६ करिता दिलेली विकासात्मक ध्येये आणि अध्ययन निष्पती यावर आधारित आहेत. यामुळे अध्यापन कार्य निश्चितच सर्वंकष आणि आनंददायी होईल. ही पुस्तिका शिक्षकांसाठी संकल्पना निर्मिती, आवश्यक क्षमता आणि कौशल्ये विकसित करणे तसेच वर्ग नियोजन करण्यास उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.



# आठवडा १

## सोमवार

**संसाधन: लेसिंग बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C

**क्रिया:** मुलांना बोर्डवरील छिद्रांमधून लेस ओवण्यास सांगा. मोठ्या वयोगटातील मुलांना लेसची गाठ मारायला देखील शिकवू शकता.

## मंगळवार

**संसाधन: मासे पकडायचा खेळ**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C

**क्रिया:** मुलांना रॉडच्या मदतीने ठरावीक वेळेत सांगितलेल्या संख्येचे मासे पकडायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2, C2.1A2

**क्रिया:** वेगवेगळ्या रंगांचे मणी एकत्र मिसळा आणि प्रत्येक रंगाचे मणी वेगळे करायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: चित्र कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C7.1B1, C7.1B2, C13.1A

**क्रिया:** मुलांना चित्र कोडी द्या आणि ती सोडवण्यास मदत करा.

## शुक्रवार

**संसाधन: गोष्टीचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना ससा आणि कासव गोष्टीचे कार्ड दाखवून कार्डांवरील गोष्ट वाचून दाखवा. त्यानंतर मुलांना कार्डाच्या मागे दिलेले प्रश्न विचारा. मुलांना प्रश्नांची उत्तरे द्यायला आणि गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करा.

# आठवडा २

## सोमवार

**संसाधन: पेग बॉक्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C, C2.1B1

**क्रिया:** मुलांना कोणत्याही एका रंगाचे नाव सांगा. मुलांना त्याच रंगाचा एक पेग निवडून छिद्रात घालायला सांगा. त्याचप्रकारे प्रत्येक मुलाला नवीन रंग सांगा आणि ते त्याच रंगाचे पेग निवडतील आणि बॉक्समध्ये लावतील, याकडे लक्ष द्या.

## मंगळवार

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** दोन्ही बाजूंनी उघडे असलेले एक खोके ठेवा. मुलांना अशा प्रकारे चेंडू फेकण्यास सांगा की खोक्याच्या एका बाजूने फेकलेला चेंडू दुसऱ्या बाजूने बाहेर पडेल.

## बुधवार

**संसाधन: कठपुतळी**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.3B

**क्रिया:** मुलांना वर्तुळात बसायला सांगा. संगीत सुरु करा आणि मुलांना कठपुतळी पुढे द्यायला सांगा. एकदा संगीत थांबले की ज्या मुलाकडे कठपुतळी आहे त्याला अभिवादन करायला आणि आपले नाव सांगायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना आईस्क्रीमच्या रंगीत काड्या द्या. त्यांना काड्यांचे रंगांच्या आधारे वेगवेगळ्या गटांमध्ये वर्गीकरण करायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: कवितेचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.1, C9.1A1, C9.1A2, C9.1B2

**क्रिया:** ससा कवितेचे कार्ड मुलांना दाखवा. हावभाव आणि तालासुरात मुलांना कविता म्हणून दाखवा. मुलांना एकसुरात कविता म्हणायला प्रोत्साहित करा. त्यांना चित्रात दिसत असलेल्या पात्रांबद्दल प्रश्न विचारा.

# आठवडा ३

**सोमवार**

**संसाधन: हुला हूप**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** हुला हूप जमिनीवर ठेवा. मुलांना सूचनेनुसार हुला हूपच्या आत किंवा बाहेर उडी मारण्यास सांगा.

**मंगळवार**

**संसाधन: क्रिया कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.2A1, C3.2A2

**क्रिया:** तुम्ही वर्तुळाच्या मध्यभागी उभे राहा आणि मुलांना तुमच्या भोवती धावण्यास सांगा. स्टॅच्यू किंवा फ्रीझ म्हणा व कोणतेही एक क्रिया कार्ड मुलांना दाखवा. मुलांना कार्डावरील क्रिया करायला सांगा. असाच खेळ पुढे चालू ठेवा.

**बुधवार**

**संसाधन: टच कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.5A, C2.5B, C9.3B2

**क्रिया:** मुलांना वेगवेगळी कार्ड देऊन, त्यांना जाणीव होणाऱ्या स्पर्शांबद्दल प्रश्न विचारा. मुलांना या अनुभवाबद्दल बोलायला प्रोत्साहित करा आणि समान स्पर्श असलेल्या इतर वस्तूंची नावे सांगण्यास सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** IL1.5, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना टॅगवर दिलेली फुले त्यांच्या सावल्यांसोबत जुळवायला सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: पाळीव प्राण्यांच्या कठपुतळ्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.3B

**क्रिया:** कठपुतळ्या वापरून मुलांना वेगवेगळ्या प्राण्यांच्या कविता म्हणून दाखवा आणि त्यांना तुमच्याबरोबर म्हणायला प्रोत्साहित करा.

# आठवडा ४

## सोमवार

**संसाधन: ध्वनी पेटी**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.3, C2.3A2, C2.3B1

**क्रिया:** मुलांना ध्वनी पेटी जोरात व हळू हलवायला सांगा. असे केल्याने दोन्ही आवाजात काय फरक आहे, ते त्यांना विचार.

## मंगळवार

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** सर्व आकार मिसळा आणि मुलांना कोणताही एक आकार दाखवा. मुलांना दाखवलेला आकार शोधायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना ऑब्जेक्ट कार्ड वरील वस्तूचा रंग ओळखायला सांगा. त्यानंतर ते कार्ड सामान रंगाच्या कप्प्यात ठेवायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: इमोशन  बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C4.2, C4.2A2, C4.2B1A, C4.2B1B

**क्रिया:** इमोशन बोर्ड वापरून वेगवेगळ्या भावना दर्शविण्यासाठी मुलांना चेहऱ्यावरील वेगवेगळे हावभाव बनवण्यास सांगा.

## शुक्रवार

**संसाधन:गोष्टीचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना ससा आणि कासव गोष्टीचे कार्ड दाखवून कार्डांवरील गोष्ट वाचून दाखवा. त्यानंतर त्यांना कार्ड, गोष्टीतील घटनांच्या क्रमाने मांडण्यास सांगा.

# आठवडा ५

**सोमवार**

**संसाधन: हेडबँड**

**अध्ययन निष्पत्ती:** C7.2B5, C7.2B6, C6.1A1

**क्रिया:** मुलांना डोक्यावर हेडबँड बांधायला द्या. हेडबँडवरील प्राण्याप्रमाणे आवाज काढायला व हालचाल करायला सांगा. जसे माकडाचा हेडबँड असेल तर माकडासारख्या उड्या मारणे इत्यादी.

**मंगळवार**

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2, C8.8, C8.8C1

**क्रिया:** मुलांना आईस्क्रीमच्या रंगीत काड्या आणि पॅटर्न कार्ड द्या. त्यांना काड्या जोडून कार्डावर दाखविलेली आकृती बनविण्यास सांगा.

**बुधवार**

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C3.2

**क्रिया:** एका ओळीत रिकामे कप ठेवा. मुलांना प्रत्येक कपात एक किंवा दोन मणी ठेऊन शर्यत पूर्ण करायला सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: हुला हूप**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** जमिनीवर दोन रेषा आखा, एक सुरुवातीची आणि थोड्या अंतरावर अंतिम रेषा. मुलांना चेंडू हूला हूपने खेचत सुरवातीपासून शेवटपर्यंत न्यायला सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: चित्रचर्चा कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना बागेचे चित्रचर्चा कार्ड दाखवा आणि कार्डाच्या मागील बाजूस दिलेले प्रश्न विचारा.

# आठवडा ६

## सोमवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** कलर ऑब्जेक्ट कार्ड आणि क्रेयॉन किंवा रंगीत खडू वर्गाच्या वेगवेगळ्या कोपऱ्यात ठेवा. मुलांना एखादे ऑब्जेक्ट कार्ड निवडण्यास सांगा आणि मग सामान रंगाचा क्रेयॉन निवडून संबंधित कप्प्यात ठेवायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: मासे पकडायचा खेळ**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2, C2.1

**क्रिया:** मुलांना मासे पकडण्याच्या रॉडच्या मदतीने विशिष्ट रंगाचा मासा उचलण्यास सांगा.

## बुधवार

**संसाधन: सापशिडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C4.4A1, C4.4B1, C4.5B2, C4.5B3

**क्रिया:** मुलांना फासे टाकायला सांगा. फास्यावरील संख्येनुसार सोंगटी पुढच्या घरात सरकवा. ज्या घरात सोंगटी पोहोचेल तिकडे लिहिलेली सूचना मुलांना वाचून दाखवा आणि त्याप्रमाणे कार्य करायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: रंग कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** IL1.5, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना कोणतेही ऑब्जेक्ट कलर कार्ड निवडण्यास सांगा. त्यांना कार्डावरील वास्तूच्या रंगाचे दोन्ही तुकडे शोधून कोडे पूर्ण करण्यास सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** पेग बॉक्स  जमिनीवर उभे ठेवा. मुलांना चेंडू द्या आणि चेंडू मारून पेग बॉक्स पाडायला सांगा.

# आठवडा ७

## सोमवार

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना फासे टाकायला सांगा. त्यांना फास्यावरील ठिपके मोजण्यास सांगा आणि त्याच संख्येचे दोन्ही तुकडे निवडून कोडे पूर्ण करायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: पाळीव प्राण्यांच्या कठपुतळ्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C7.2B5, C7.2B6, C6.1A1

**क्रिया:** मुलांना पाळीव प्राण्यांच्या कठपुतळ्या दाखवा आणि त्यांना त्यांच्या राहण्याच्या जागेबद्दल सांगा. त्यांना प्रत्येक प्राण्याचे आवाज किंवा हालचाली करून दाखवा. जसे की ही गाय आहे. गाय गोठ्यात राहते, इत्यादी.

## बुधवार

**संसाधन: चित्रचर्चा कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना बागेचे चित्रचर्चा कार्ड दाखवा. त्यांना चित्रातील विविध सजीव आणि निर्जीव वस्तू दाखवा. नंतर मुलांना त्या वस्तू ओळखण्यास सांगा आणि त्यांची नावे विचारा.

## गुरुवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** HW1.18, C8.3A, C8.3B, C3.3A

**क्रिया:** टॅगवर दिलेल्या संख्येनुसार मुलांना दोरीत मणी ओवायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2, C8.8, C8.8C1

**क्रिया:** मुलांना आईस्क्रीमच्या रंगीत काड्या द्या. त्यांना त्यांच्या कल्पनेनुसार काड्या जोडून वेगवेगळ्या वस्तूंचे आकार बनविण्यास सांगा.

# आठवडा ८

## सोमवार

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2, C2.1

**क्रिया:** सर्व आकार मिसळा आणि मुलांना कोणताही एक आकार दाखवा. मुलांना दाखवलेल्या आकाराच्या रंगाचे इतर आकार शोधायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: पेग बॉक्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C

**क्रिया:** प्रत्येक मुलाला समान संख्येने पेग वाटा. नंतर प्रत्येकाला फासे टाकायला सांगा. फास्यावर आलेल्या संख्येप्रमाणे आपल्या जवळील पेग घालायला सांगा. ज्या मुलाचे सर्व पेग संपतील तो खेळ जिंकतो.

## बुधवार

**संसाधन: क्रिया कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.2A1, C3.2A2

**क्रिया:** कार्डावरील कोणतीही एक क्रिया करा आणि ती क्रिया कुठल्या क्रिया कार्डाची आहे हे मुलांना ओळखण्यास सांगा.

## गुरुवार

**संसाधन: हेडबँड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.1, C9.1A1, C9.1A2, C9.1B2

**क्रिया:** मुलांना डोक्यावर हेडबँड बांधायला द्या. हेडबँड बांधून हावभावासह कविता म्हणायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** कलर ऑब्जेक्ट कार्ड आणि क्रेयॉन किंवा रंगीत खडू वर्गाच्या वेगवेगळ्या कोपऱ्यात ठेवा. मुलांना एखादे ऑब्जेक्ट कार्ड निवडण्यास सांगा आणि मग समान रंगाचा क्रेयॉन निवडून संबंधित कप्प्यात ठेवायला सांगा.

# आठवडा ९

**सोमवार**

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** मुलांना वर्तुळात बसवा, संगीत सुरु करा आणि चेंडू पास करायला सांगा. संगीत थांबल्यावर, चेंडू जवळ असलेल्या मुलाला वर्तुळाच्या मध्यभागी यावे लागेल आणि गाणे, नृत्य इत्यादी कोणतीही क्रिया करावी लागेल. यानंतर तो मुलगा किंवा मुलगी उर्वरित खेळातून  बाहेर होईल. सगळ्यात शेवटी नाबाद राहणारा मुलगा खेळ जिंकेल.

**मंगळवार**

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना फास्यावरील संख्येप्रमाणे टॅगची दोरी निवडायला सांगा. निवडलेल्या टॅगच्या संख्येनुसार मणी ओवायला सांगा.

**बुधवार**

**संसाधन: हुला हूप**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** या शर्यतीसाठी ट्रॅकवर एक लहान टेबल, खुर्ची आणि हुला हूप यासारखे काही अडथळे ठेवा. मुलांना टेबलवरून उडी मारायला सांगा आणि खुर्चीच्या खालून जायला सांगा. मग त्यांना स्वत:ला हुला हूपमधून पार करून शर्यत पूर्ण करावी लागेल.

**गुरुवार**

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना खडे, मणी इत्यादी वस्तू मोजायला सांगा आणि त्यांना संबंधित क्रमांकाच्या कप्प्यात ठेवायला सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: बाहुली**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.3B

**क्रिया:** मुलांना अर्धवर्तुळात बसवा. बाहुलीकडे बोट दाखवून मुलांना शरीराच्या वेगवेगळ्या भागांबद्दल सांगा. बाहुलीचा वापर करून त्यांना आंघोळ कशी करावी किंवा हात कसे धूवावे ते दाखवा. आरोग्य, स्वच्छता आणि चांगल्या सवयींशी संबंधित संकल्पनांचा परिचय करून देण्यासाठी आपण बाहुलीचा वापर करू शकतो.

# आठवडा १०

**सोमवार**

**संसाधन: चित्र कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C7.1B1, C7.1B2, C13.1A

**क्रिया:** मुलांना दोन गटांमध्ये विभाजित करून कोडी सोडवायला सांगा. जो गट सगळ्यात आधी कोडे सोडवेल तो विजेता होईल. याचबरोबर कोडे सोडविल्यावर त्यावरील चित्राबद्दल मुलांशी चर्चा करा.

**मंगळवार**

**संसाधन: लेसिंग बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C

**क्रिया:** मुलांच्या जोड्या बनवा आणि त्यांना प्रत्येकी एक बोर्ड द्या. त्यांना त्यात लेस ओवण्यास सांगा. जो प्रथम पूर्ण करेल तो खेळ जिंकेल.

**बुधवार**

**संसाधन: संख्या रोल आणि कव्हर मॅट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना फासे टाकायाला सांगा. फास्यावरील संख्या मोजून संख्येप्रमाणे मॅटवर तोच अंक शोधायला सांगा आणि त्याला चिन्हांकित करायला सांगा. हा खेळ मुलांचा गट बनवून देखील खेळला जाऊ शकतो. गटातील प्रत्येक मुलाला एकानंतर एक फासे टाकायची संधी द्या.

**गुरुवार**

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8 A1, C8.8A2

**क्रिया:** बोर्डवर मोठे आणि लहान अशी लेबले लावा. मुलांना एक ऑब्जेक्ट कार्ड निवडण्यास सांगा आणि ते योग्य कप्प्यात ठेवायला सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: कवितेचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.1, C9.1A1, C9.1A2, C9.1B2

**क्रिया:** भरीत कवितेचे कार्ड मुलांना दाखवा. हावभाव आणि तालासुरात मुलांना कविता म्हणून दाखवा. मुलांना एकत्रितपणे कविता म्हणायला प्रोत्साहित करा. त्यांना चित्रात दिसत असलेल्या पात्रांबद्दल प्रश्न विचारा.

# आठवडा ११

## सोमवार

**संसाधन: टच कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.5A, C2.5B, C4.5A

**क्रिया:** फक्त स्पर्शाच्या आधारावर मुलांना दोन समान स्पर्शाच्या कार्डांची जोडी बनवायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना समान आकारांचे संच तयार करण्यास सांगा. जसे सर्व वर्तुळ एकत्र आणि अर्धवर्तुळ एकत्र वगैरे.

## बुधवार

**संसाधन: कठपुतळी**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.3B

**क्रिया:** या क्रियेसाठी कठपुतळी वापरून मुलांना वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे द्यायला सांगा. जसे-

१. या आठवड्यात झालेली अशी एक घटना सांगा ज्यामुळे तुम्हांला खूप आनंद झाला.
२. या आठवड्यात झालेली अशी एक घटना सांगा ज्यामुळे तुम्हांला वाईट वाटलं.
३. या आठवड्यात झालेली अशी एक घटना सांगा ज्यामुळे तुम्हांला राग आला.

## गुरुवार

**संसाधन: अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** मुलांना त्यांच्या नावाचे पहिले अक्षर ओळखायला सांगा आणि ते अक्षर चिन्हांकित करायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना दोरीवरील टॅगप्रमाणे समान रंगाचे आणि संख्येचे मणी ओवण्यास सांगा.

# आठवडा १२

**सोमवार**

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B1, C8.3B4

**क्रिया:** मुलांना कोड्यातील डॉटची बाजू द्या व त्यावरील डॉट्स मोजायला सांगा. डॉट्सच्या संख्येप्रमाणे टोकन कार्डांवर ठेवायला सांगा.

**मंगळवार**

**संसाधन: ध्वनी पेटी**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.3, C2.3A2, C2.3B1

**क्रिया:** मुलांना प्रत्येक पेटी वाजवायला सांगा. नंतर त्यांना एकसारखे आवाज असलेल्या पेट्यांच्या जोड्या बनविण्यास सांगा.

**बुधवार**

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना कोणतीही एक संख्या सांगा. समान संख्येच्या काड्या मोजून मुलांना कप्प्यांच्या बोर्डमध्ये ठेवायला सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना मोजणीचे ऑब्जेक्ट कार्ड वाटा  सामान संख्येची कार्ड असलेल्या मुलांना गट बनवायला सांगा. गट बनवून आपापली कार्डे संबंधित संख्येच्या कप्यात ठेवायला सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: हुला हूप**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** हुला हूप धरा आणि मुलांना हुला हूपमधून चेंडू फेकण्यास सांगा. प्रत्येक फेरीनंतर हूप आणि मुलांमधील अंतर वाढवा. आपण ह्या खेळाच्या, जवळ, थोडे लांब आणि जास्त लांब अशा एकूण तीन फेऱ्या घेऊ शकतो.

# आठवडा १३

## सोमवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** IL1.5, C8.8A1, C8.8A2, C2.1A2

**क्रिया:** मुलांना टॅगवर दिलेल्या फुलांच्या रंगाशी जुळणारे मणी दोरीत ओवायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: क्रिया कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.2A1, C3.2A2

**क्रिया:** प्रत्येक खुर्चीवर एक क्रिया कार्ड ठेवा आणि संगीत सुरु करा. संगीत बंद होताच मुलांना खुर्च्यांसमोर थांबायला सांगा. आपल्या समोरच्या खुर्चीवर ठेवलेल्या कार्डावर असलेली क्रिया करायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: मासे पकडायचा खेळ**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना रॉडच्या मदतीने शक्य तेवढ्या चुंबकीय वस्तू उचलण्यास सांगा. नंतर वस्तू मोजून संख्येनुसार कप्प्यांचा बोर्डवर किंवा डॉट कार्ड्सवर ठेवायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: गोष्टीचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** ससा आणि कासव गोष्टीचे कार्ड घ्या आणि कार्डाची मागील बाजूला जिथे मजकूर असेल तो भाग मुलांना दाखवा. लहान वयोगटातील मुलांना वेगवेगळी अक्षरं सांगा आणि गोष्टीच्या मजकूरात ती अक्षरे शोधायला सांगा. मोठ्या वयोगटातील मुलांना दोन ते तीन-अक्षरी शब्द शोधायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** एक खोके एका लहान स्टुलावर ठेवा. मुलांना थोड्या अंतरावर उभे राहून चेंडू खोक्यात फेकायला सांगा. प्रत्येक फेरीनंतर खोके आणि मुलांमधील अंतर वाढवा.

# आठवडा १४

**सोमवार**

**संसाधन: हेडबँड**

**अध्ययन निष्पत्ती:** C7.2B5, C7.2B6, C6.1A1

**क्रिया:** मुलांना हेडबँडवरील प्राण्यांची गोष्ट सांगा. त्यानंतर त्यांना हेडबँड घालून गोष्टीप्रमाणे अभिनय करायला प्रोत्साहित करा.

**मंगळवार**

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** मुलांसमोर कोड्यातील संख्येचा भाग ठेवा आणि त्यांना दिलेल्या आकड्यांच्या आधी येणारे अंक ठेवायला सांगा.

**बुधवार**

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2, C8.9B2

**क्रिया:** मुलांना बोर्डावर जड आणि हलके अशी लेबल्स लावा. नंतर त्यांना एक ऑब्जेक्ट कार्ड निवडण्यास सांगा आणि ते योग्य कप्प्यात ठेवायला सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: संख्या रोल आणि कव्हर मॅट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना कोणतेही डॉट कार्ड द्या. नंतर त्यांना डॉट्स मोजण्यास सांगा. संख्येप्रमाणे मॅटवर तोच अंक शोधायला सांगा आणि त्याला चिन्हांकित करायला सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: कवितेचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.1, C9.1A1, C9.1A2, C9.1B2

**क्रिया:** झुरळ कवितेचे कार्ड मुलांना दाखवा. हावभाव आणि तालासुरात मुलांना कविता म्हणून दाखवा. नंतर त्यांना एकत्रितपणे कविता म्हणायला प्रोत्साहित करा. त्यांना चित्रात दिसत असलेल्या पात्रांबद्दल प्रश्न विचारा.

# आठवडा १५

**सोमवार**

**संसाधन: अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** मुलांना कोणतेही ऑब्जेक्ट कार्ड निवडण्यास सांगा. त्यांना कार्डावरील वास्तूचे सुरुवातीचे अक्षर ओळखण्यास सांगा आणि नंतर ते अक्षर मॅटवर चिन्हांकित करायला सांगा.

**मंगळवार**

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.5A, C8.5B, C8.5C

**क्रिया:** दोन वेगवेगळ्या संख्येचे मणी ठेवा. नंतर मुलांना अधिक मणी असलेला गट निवडण्यास सांगा.

**बुधवार**

**संसाधन: पेग बॉक्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C

**क्रिया:** मुलांना एका रंगाचे पेग दुसऱ्या रंगाच्या छिद्रात घालण्यास सांगा उदा. निळे पेग हिरव्या छिद्रांमध्ये आणि लाल पेग नारंगी छिद्रांमध्ये. तुम्ही फळ्यावर वेगवेगळ्या रंगांच्या जोड्या देखील लिहू शकता आणि मुलांना त्याप्रमाणे क्रिया करायला सांगू शकता.

**गुरुवार**

**संसाधन: लेसिंग बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C

**क्रिया:** मुलांना डोळे बंद करायला सांगा आणि कोणत्याही चार छिद्रांमध्ये फक्त स्पर्शाच्या सहाय्याने लेस ओवण्यास सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना कप्प्यांच्या बोर्डवर दिलेल्या रंगानुसार आईस्क्रीमच्या काड्या ठेवायला सांगा.

# आठवडा १६

## सोमवार

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना कोणताही एक आकार दाखवा. त्यांना त्यांच्या आजूबाजूला समान आकाराच्या वस्तू शोधण्यास सांगा. उदाहरणार्थ: चौरस आकार दाखवा. मुले त्या चौकोनी आकाराला रुमाल किंवा चौकोनी पुस्तकाशी जुळवू शकतात.

## मंगळवार

**संसाधन: शब्द कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** फळ्यावर एक शब्द लिहा आणि मुलांना योग्य शब्द कार्ड निवडण्यास सांगा.

## बुधवार

**संसाधन: हुला हूप**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** पेग बॉक्स टेबलावर उभे ठेवा. पेग बॉक्स न पाडता मुलांना त्या भोवती हूप टाकायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1, C8.8A1

**क्रिया:** फळ्यावर अक्षरे लिहा. मुलांना ती अक्षरे शोधून त्याच रंगाचा स्टिकर असलेल्या कप्प्यात ठेवायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B4, C4.5B

**क्रिया:** मुलांना कोणतेही एक डॉट कार्ड दाखवा व त्यावरील डॉट्स मोजायला सांगा. डॉट्सच्या संख्येप्रमाणे मुलांना एकमेकांबरोबर गट बनवायला सांगा.

# आठवडा १७

## सोमवार

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** कोड्यातील संख्येचा भाग ठेवा आणि मुलांना दिलेल्या आकड्यांच्या नंतर येणारे अंक ठेवायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A2, C1.1A1

**क्रिया:** मुलांना ऑब्जेक्ट कार्ड द्या. त्यांना कार्डवरील ऑब्जेक्ट प्राणी आणि पक्षी गटात विभाजित करायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: रंग कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** IL1.5, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना रंगांची कोडी सोडवायला सांगा. मग त्यांना समान रंगांचे ऑब्जेक्ट कार्ड्स शोधून कोड्यांबरोबर ठेवायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** या क्रियेसाठी जमिनीवर एक रेषा काढा. नंतर मुलांना चेंडू त्यांच्या तळहातावरून पडू न देता ओळीवर चालण्यास सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: पाळीव प्राण्यांच्या कठपुतळ्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C7.2B5, C7.2B6, C6.1A1

**क्रिया:** मुलांना कोणतीही एक पाळीव प्राण्याची कठपुतळी निवडायला सांगा. नंतर त्यांना निवडलेल्या प्राण्याचा आवाज किंवा हालचाल करण्यास सांगा.

# आठवडा १८

## सोमवार

**संसाधन: मासे पकडायचा खेळ**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2, C2.1A2, C2.1B2

**क्रिया:** मुलांना फक्त सर्व लहान मासे किंवा फक्त मोठे मासे पकडण्यास सांगा.

## मंगळवार

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2, C8.3A, C8.3B

**क्रिया:** मुलांना कोणतीही एक संख्या आणि एक रंग सांगा. समान संख्येचे आणि रंगाच्या काड्या मोजून त्या त्यांना कप्प्यांच्या बोर्डमध्ये ठेवायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** HW1.18, C3.3A, C4.5B

**क्रिया:** ३ ते ४ मुलांचे छोटे गट करा. प्रत्येक मुलाला समान संख्यचे मणी आणि एक दोरी द्या. त्यांना मणी ओवायला सांगा. जो प्रथम पूर्ण करेल तो विजेता होईल.

## गुरुवार

**संसाधन: बाहुली**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.8A3, C8.8B4, C8.8C3

**क्रिया:** मुलांना बाहुली वेगवेगळ्या जागेवर ठेवण्यास सांगा. जसे की बाहुली खुर्चीवर ठेवा किंवा टेबलाखाली ठेवा.

## शुक्रवार

**संसाधन: क्रिया कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.2A1, C3.2A2

**क्रिया:** मुलांना कोणतेही एक क्रिया कार्ड निवडायला सांगा. त्यानंतर त्यांना फासे टाकायला सांगा. फास्यावरील संख्येनुसार मुलांना तेवढे सेकंद निवडलेल्या क्रिया कार्डावरची क्रिया करायला सांगा.

# आठवडा १९

## सोमवार

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B1, C8.3B4

**क्रिया:** मुलांना कोणतेही एक डॉट कार्ड दाखवा व त्यावरील डॉट्स मोजायला सांगा. डॉट्सच्या संख्येप्रमाणे मुलांना बिया किंवा मणी मोजायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.8A1, C8.8A2, C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** वेगवेगळ्या रंगांचे ऑब्जेक्ट कार्ड जमिनीवर पसरवा. त्यानंतर मुलांना लहान गटांमध्ये विभाजित करा. नंतर त्यांना रंगाचे नाव सांगा. मुलांना धावत जाऊन त्या रंगांचे सर्व कार्ड्स शोधायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: ध्वनी पेटी**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.3, C2.3A 2, C2.3B1

**क्रिया:** प्रत्येक मुलाला एक ध्वनी पेटी द्या. त्यांना आवाज ऐकण्यास सांगा आणि समान ध्वनी पेटी असलेल्या इतर मुलासह जोडी बनविण्यास सांगा.

## गुरुवार

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** या क्रियांसाठी मुलांना सर्व आकार द्या आणि त्यांना लहान ते मोठे किंवा मोठे ते लहान अशा क्रमाने लावायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** जादुई पिटाऱ्यात दिलेली अक्षरे एका पिशवीत किंवा बॉक्समध्ये ठेवा. मुलांना न पाहता त्यामधील अक्षरे उचलायला सांगा व मॅटवर समान अक्षरावर ठेवायला सांगा.

# आठवडा २०

## सोमवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना टॅगवरील फुलांच्या पाकळ्या मोजायला सांगा आणि मण्यांची योग्य संख्या ओवायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2, C8.2A, C8.8A1, C3.4C1

**क्रिया:** वेगवेगळ्या रंगांचे कलर ऑब्जेक्ट कार्ड्स रांगेमध्ये ठेवा. मुलांना आईस्क्रीमच्या रंगीत काड्या द्या. त्यांनी प्रत्येक कार्डावर समान रंगाची एक काडी ठेऊन शर्यत पूर्ण करायची.

## बुधवार

**संसाधन: संख्या रोल आणि कव्हर मॅट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** एखादी कृती ठरावीक वेळा करा जसे तीन वेळा टाळ्या वाजविणे. तुम्ही कृती किती वेळा करता ते मुलांना निरीक्षण करायला आणि मोजायला सांगा. कृती किती वेळा केली जाते यावर अवलंबून, मुलांना मॅटवर समान संख्या चिन्हांकित करायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: शब्द कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** ३ अक्षरे आणि ३ रंगीत स्टिकर्स ठेवा. मुलांना अक्षरांचे संयोजन लक्षात ठेवण्यास सांगा. रंगीत स्टिकर्सची पुनर्रचना करा. मुलांना योग्य अक्षरे ठेवण्यास सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: टच कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.5A, C2.5B, C4.5B

**क्रिया:** मुलांमध्ये टच कार्ड वितरित करा. त्यांना समान स्पर्शांचे कार्ड असलेल्या इतर मुलांसोबत जोड्या बनवायला सांगा.

# आठवडा २१

**सोमवार**

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.1C, C7.1A

**क्रिया:** मुलांना ऑब्जेक्ट कार्ड द्या. त्यांना कार्डवरील ऑब्जेक्ट सजीव आणि निर्जीव गटात विभाजित करायला सांगा.

**मंगळवार**

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** दोन मुलांना वर्तमानपत्रावर चेंडू संतुलित करण्यास सांगा आणि चेंडू न पाडता एका टोक पासून दुसऱ्या टोका पर्यंत नेण्यास सांगा.

**बुधवार**

**संसाधन: गोष्टीचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना बोलकी गुहा गोष्टीचे कार्ड दाखवून कार्डांवरील गोष्ट वाचून दाखवा. त्यानंतर त्यांना  कार्डाच्या मागे दिलेले प्रश्न विचारा. मुलांना प्रश्नांची उत्तरे द्यायला आणि गोष्टीबद्दल बोलायला प्रोत्साहित करा.

**गुरुवार**

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B1, C8.3B4

**क्रिया:** मुलांना कोणतेही एक डॉट कार्ड घेण्यास सांगा कार्डावरील संख्येनुसार तितक्या वेळा ठराविक क्रिया करायला सांगा. जसे पाच डॉट्स असतील तर पाच वेळा टाळ्या वाजवा. किंवा तीन डॉट्स असतील तर तीन वेळा उड्या मारा इत्यादी.

**शुक्रवार**

**संसाधन: पेग बॉक्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C, C8.2A

**क्रिया:** मुलांना पेग बॉक्सवर पेगच्या साहाय्याने वेगवेगळे आकार आणि आकृतिबंध बनवायला सांगा.

# आठवडा २२

## सोमवार

**संसाधन: हुला हूप**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** मुलांना हुला हूप कंबरेभोवती गोल फिरविण्याचा प्रयत्न करायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C, C3.2

**क्रिया:** मणी गोळा करण्याची शर्यत-मणी आणि टॅग ओळीत ठेवा. मुलांना टॅग उचलून, सूचित संख्येचे मणी ओवून शर्यत पूर्ण करायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** मुलांना मोजणीचे ऑब्जेक्ट कार्ड्स द्या आणि मुलांना दिलेल्या आकड्यांच्या आधी येणाऱ्या अंकांचे कार्ड्स शोधून ठेवायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: इमोशन बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C4.2, C4.2A2, C4.2B1A, C4.2B1B

**क्रिया:** आपल्या चेहऱ्यावर वेगवेगळे भाव आणून मुलांना दाखवा, जसे हसणे, रडणे, रागावणे इत्यादी. मुलांना ते ओळखून इमोशन बोर्डावर त्यासारखाच चेहरा तयार करायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** कोड्यातील संख्येचा भाग ठेवा आणि मुलांना दिलेल्या आकड्यांच्या मध्ये येणारे अंक ठेवायला सांगा.

# आठवडा २३

**सोमवार**

**संसाधन: अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** मुलांना गटात विभागून प्रत्येक गटाला एक मॅट द्या. एका पिशवीतून एकएक अक्षर काढा आणि मुलांना दाखवा. समान अक्षर असलेल्या मॅटवर तो गट ते अक्षर चिन्हांकित करेल. सर्व अक्षरे प्रथम चिन्हांकित करणारा गट खेळ जिंकेल.

**मंगळवार**

**संसाधन: मासे पकडायचा खेळ**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2, C2.1B2

**क्रिया:** मुलांना दोन गुणधर्मांशी जुळणारे मासे पकडायला सांगा. जसे की, मोठा लाल मासा किंवा लहान हिरवा मासा.

**बुधवार**

**संसाधन: कठपुतळी**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.3B

**क्रिया:** मुलांना कठपुतळी वापरून एखाद्या विषयावर संभाषण करण्यास प्रोत्साहित करा.

**गुरुवार**

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना फासे टाकायला सांगा. फास्यावरील संख्येनुसार समान संख्येचे डॉट कार्ड दाखवायला सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C12.1, C12.3, C12.1C

**क्रिया:** मुलांना दिलेल्या आकारांसह वेगवेगळ्या वस्तू बनवायला सांगा. विविध आकार वापरून त्यांच्या कलात्मकतेप्रमाणे, घर, आईस्क्रीम कोन, बोट अशा विविध वस्तू ते बनवू शकतात.

# आठवडा २४

**सोमवार**

**संसाधन: क्रिया कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.2A1, C3.2A2

**क्रिया:** प्रत्येकी ५ सेकंद तीन क्रिया कार्ड मुलांना दाखवा आणि त्यांना दाखवलेल्या अनुक्रमाने क्रिया करण्यास सांगा.

**मंगळवार**

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2, C8.2A, C8.8A1

**क्रिया:** क्रिया कार्ड्वर दाखवल्याप्रमाणे काड्यांपासून आकृत्या बनवा.

**बुधवार**

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5C, C8.6B

**क्रिया:** दोन वेगवेगळ्या प्रमाणात मणी ठेवा. मुलांना एकत्र मणी मोजायला सांगा आणि एकूण मण्यांची संख्या शोधायला सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: क्रिया कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मेमरी गेम-मोजणी कार्ड्स उलटे ठेवा. मुलांनी कार्ड फिरवून त्याच संख्येच्या कार्डशी जुळवावे.

**शुक्रवार**

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** मुलांना मोजणीचे ऑब्जेक्ट कार्ड द्या आणि त्यांना दिलेल्या आकड्यांच्या नंतर येणाऱ्या अंकांचे कार्ड शोधून ठेवायला सांगा.

# आठवडा २५

**सोमवार**

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** मुलांना वर्तुळात उभे करा. प्रत्येक मुलाला एक क्रमांक द्या. नंतर कोणताही एक क्रमांक सांगा आणि पहिल्या मुलाला त्या क्रमांकाच्या मुलाकडे चेंडू फेकायला सांगा. अशा प्रकारे मुलांना सांगितलेल्या क्रमांकाप्रमाणे एकमेकांकडे चेंडू फेकायचा आहे.

**मंगळवार**

**संसाधन: हेडबँड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** हेडबँड घालून मुलांना प्राण्यांची शर्यत लावायला सांगा. मुले प्राण्यांप्रमाणे उड्या मारून देखील शर्यत लावू शकतात.

**बुधवार**

**संसाधन: गोष्टीचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना बोलकी गुहा गोष्टीचे कार्ड दाखवून कार्डांवरील गोष्ट वाचून दाखवा. त्यानंतर मुलांना कार्ड्स, गोष्टीतील घटनांच्या क्रमाने मांडण्यास सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: चित्र कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C7.1B1, C7.1B2, C13.1A

**क्रिया:** दोन वेगवेगळ्या कोड्यांचे भाग मिसळा. मुलांना भाग वेगळे करून कोडी पूर्ण करण्यास सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: संख्या रोल आणि कव्हर मॅट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना विविध वस्तू जसे मणी, बिया, खडे  इत्यादी मोजण्यासाठी द्या आणि त्या वस्तू त्यांना मोजण्यास सांगा. संख्येप्रमाणे मॅटवर तोच अंक शोधायला सांगा आणि त्याला चिन्हांकित करायला सांगा.

# आठवडा २६

## सोमवार

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A4, C8.3B, C8.3A6

**क्रिया:** मुलांना कोणतेही डॉट कार्ड दाखवा आणि त्यांना मोजल्याशिवाय कार्ड्सवरील डॉट्सच्या संख्येचा अंदाज घेण्यास सांगा. त्यानंतर डॉट्स मोजून दाखवा आणि त्यांचे उत्तर बरोबर होते की नाही हे तपासा.

## मंगळवार

**संसाधन: शब्द कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** मुलांना शब्द कार्ड व अक्षरे द्या. कार्डावरील चित्र त्यांना ओळखायला सांगा. दिलेली अक्षरे वापरून शब्द बनविण्यास सांगा.

## बुधवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** मुलांना मोजणीचे ऑब्जेक्ट कार्ड द्या आणि मुलांना दिलेल्या आकड्यांमध्ये येणाऱ्या अंकांचे कार्ड शोधून ठेवायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: ध्वनी पेटी**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.3, C2.3A 2, C2.3B1

**क्रिया:** ध्वनी पेटीचा एक संच एका क्रमाने ठेवा. मुलांना आवाज ऐकायला सांगा आणि त्याच क्रमाने दुसरा संच त्यांना लावायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: कवितेचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.1, C9.1A1, C9.1A2, C9.1B2

**क्रिया:** इडली कवितेचे कार्ड मुलांना दाखवा. हावभाव आणि तालासुरात मुलांना कविता म्हणून दाखवा.  मुलांना एकत्रितपणे कविता म्हणायला प्रोत्साहित करा. त्यांना चित्रात दिसत असलेल्या पात्रांबद्दल प्रश्न विचारा.

# आठवडा २७

## सोमवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** प्रत्येक दोरीवर काही मणी ओवा. मुलांना मणी मोजण्यास सांगा आणि टॅगवर लिहिलेली संख्या पूर्ण करण्यासाठी उर्वरित मणी ओवण्यास सांगा.

## मंगळवार

**संसाधन: गोष्टीचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** बोलकी गुहा कार्ड घ्या आणि कार्डची मागील बाजूस जिथे मजकूर असेल तो भाग मुलांना दाखवा. लहान वयोगटातील मुलांना वेगवेगळी अक्षर सांगा आणि गोष्टीच्या मजकूरात ती अक्षरे शोधायला सांगा. मोठ्या वयोगटातील मुलांना दोन ते तीन-अक्षरी शब्द शोधायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** ५ अक्षरे आणि ५ ऑब्जेक्ट कार्ड्सचा संच एकमेकांसमोर ठेवा. मुलांना ते एकमेकांशी जुळवून जोड्या बनवायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: हुला हूप**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** हुला हूप धरा आणि मुलांना हूपमधून जायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2, C8.2A, C8.8A1

**क्रिया:** काड्यांसह वेगवेगळे आकृतिबंध बनवा. मुलांना समान आकृतिबंध तयार करण्यास सांगा.

# आठवडा २८

## सोमवार

**संसाधन: टच कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.5A, C2.5B, C4.5A

**क्रिया:** टच कार्ड एका पिशवीत ठेवा. मुलांना स्पर्शाच्या सहाय्याने  एक मऊ आणि एक खरबरीत कार्ड शोधायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5C, C8.2A

**क्रिया:** मुलांना दोन गटांत विभाजित करा. अंक कोड्यांच्या संख्येची बाजू एका गटाला आणि डॉटची बाजू दुसऱ्या गटाला वितरित करा. कुठलीही एक संख्या सांगा. ती संख्या असलेली दोन्ही गटातील मुले पुढे येऊन कोडे पूर्ण करतील.

## बुधवार

**संसाधन: पेग बॉक्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C

**क्रिया:** मुलांना ३० सेकंदात पेग छिद्रात घालायचे आहेत. शिक्षकांनी ३० सेकंदांचा टाइमर लावावा किंवा इतर मुलांना ३० पर्यंत मोजायला सांगावे. दिलेल्या अवधीत जो सगळ्यांत जास्त पेग घालेल तो खेळ जिंकेल.

## गुरुवार

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** कलर ऑब्जेक्ट कार्ड्स वापरा आणि कागदाच्या स्लिपवर त्याचा आकार काढा. मुलांना एक कार्ड आणि एक स्लिप घेण्यास सांगा आणि नंतर त्या रंगाचा आकार शोधायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** मुलांना कोणतेही ५ मोजणीचे ऑब्जेक्ट कार्ड द्या आणि त्यांना चढत्या क्रमाने मांडण्यास सांगा.

# आठवडा २९

## सोमवार

**संसाधन: क्रिया कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.2A1, C3.2A2

**क्रिया:** जमिनीवर १ ते ५ क्रमांक लिहा आणि त्यावर वेगवेगळी क्रिया कार्ड्स ठेवा. मुलांनी पहिल्या क्रमांकापासून सुरुवात करून कार्डावरील कृती करायला सांगा. मग त्यांना पुढील क्रमांकावर उडी मारून पुढील क्रिया करावी लागेल. अशाच प्रकारे त्यांना १ ते ५ सर्व क्रिया पूर्ण करण्यास सांगा.

## मंगळवार

**संसाधन: हुला हूप**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** हूप स्वत: भोवती पास करत मुलांना एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यास सांगा.

## बुधवार

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2, C8.2A, C8.8A1

**क्रिया:** काड्यांसह वेगवेगळे आकृतिबंध बनवा. मुलांना आकृतिबंध पूर्ण करण्यास सांगा.

## गुरुवार

**संसाधन: मासे पकडायचा खेळ**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2, C2.1B2

**क्रिया:** मुलांना समान आकाराचे मासे पकडण्यास आणि वेगवेगळे करण्यास सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5C, C8.2A

**क्रिया:** मुलांना टॅगवरील संख्येनुसार आणि आकृतिबंधानुसार मणी ओवण्यास सांगा.

# आठवडा ३०

**सोमवार**

**संसाधन: रंग कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** IL1.5, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना दोन गटांत विभाजित करा. रंग कोड्यांच्या रंगाची बाजू एका गटाला आणि चित्राची बाजू दुसऱ्या गटाला वितरित करा. कोणताही एक रंग सांगा. तो रंग असलेल्या दोन्ही गटातील मुले पुढे येऊन कोडे पूर्ण करतील.

---

**मंगळवार**

**संसाधन: बाहुली**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.3B

**क्रिया:** मुलांना अर्धवर्तुळात बसवा. बाहुली अशा प्रकारे पकडा की सर्व मुले ती पाहू शकतील. कपडे आणि त्यांचे महत्त्व याबद्दल बोला. मुलांना बाहुलीचे कपडे घालायची कृती करायला सांगा. अश्याच प्रकारे घरी ते स्वत:चे कपडे देखील घालू शकतात असे त्यांना प्रोत्साहित करा.

---

**बुधवार**

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** मुलांना कोणतेही ५ अंकांचे भाग द्या आणि त्यांना चढत्या क्रमाने मांडण्यास सांगा.

---

**गुरुवार**

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** मुलांना त्यांच्या पायामध्ये चेंडू धरून, एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जायला सांगा.

---

**शुक्रवार**

**संसाधन: संख्या रोल आणि कव्हर मॅट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** मुलांना डोळे बंद करून मॅट वरील कोणत्याही एका अंकावर बोट ठेवण्यास सांगा. मग त्यांना समान प्रमाणात काउंटर मोजून ठेवण्यास सांगा.

# आठवडा ३१

## सोमवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** समान संख्येच्या मण्यांचे संच बनवा. मुलांना संच मोजायला सांगा. जसे की ५ मण्यांचे २ संच किंवा २ मण्यांचे ३ संच इत्यादी.

## मंगळवार

**संसाधन: अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1, C8.8A1

**क्रिया:** मुलांना दोन गटांत विभाजित करा. एका गटाला अक्षरे आणि दुसऱ्या गटाला ऑब्जेक्ट कार्ड द्या. त्यांना जोडी जुळण्यास सांगा आणि मॅटवर अक्षरे चिन्हांकित करा.

## बुधवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** मुलांना कोणतेही ५ मोजणीचे ऑब्जेक्ट कार्ड द्या आणि त्यांना उतरत्या क्रमाने मांडण्यास सांगा.

## गुरुवार

**संसाधन: गोष्टीचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना हत्ती आणि उंदीर गोष्टीचे कार्ड दाखवून कार्डांवरील गोष्ट वाचून दाखवा. त्यानंतर मुलांना कार्डाच्या मागे दिलेले प्रश्न विचारा. मुलांना प्रश्नांची उत्तरे द्यायला आणि गोष्टीबद्दल बोलायला प्रोत्साहित करा.

## शुक्रवार

**संसाधन: इमोशन बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C4.2, C4.2A2, C4.2B1A, C4.2B1B

**क्रिया:** या क्रियेसाठी मुलांना एक विशिष्ट परिस्थिती सांगा. जसे त्यांच आवडत खेळणं तुटलं, किंवा त्यांना नवीन भेटवस्तू मिळाली इत्यादी. त्या परिस्थितीत त्यांना कसे वाटेल याचा विचार करून त्याप्रमाणे इमोशन बोर्डवर चेहरा बनवण्यास सांगा.

# आठवडा ३२

## सोमवार

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2, C8.2A, C8.8A1

**क्रिया:** वेगवेगळे आकार एकावर एक ठेवा. मुलांना समान क्रमाने स्टॅक बनवायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B, C8.6B1, C8.6C1

**क्रिया:** मुलांना काड्या द्या आणि मोजायला सांगा. त्यांना ठराविक संख्येच्या काड्या त्या मध्ये वाढवून काड्या पुन्हा मोजायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** IL1.5, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** १ ते ५ डॉट कार्ड आणि ५ रंगाचे कार्ड उलटे करून ठेवा. मुलांना एक डॉट कार्ड आणि एक कलर कार्ड उघडायला सांगा. नंतर त्यांना रंगीत ऑब्जेक्ट कार्ड्सची जुळणारी संख्या निवडायला सांगा. उदाहरणार्थ, २ डॉट कार्ड आणि रेड कलर कार्ड साठी मूल दोन रेड ऑब्जेक्ट कलर कार्ड निवडतील.

## गुरुवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** ३ रंगीत ऑब्जेक्ट कार्ड समान अंतरावर ठेवा. शर्यत समाप्ती रेषेवर पॉकेट बोर्ड ठेवा. मुलांना कार्ड गोळा करायला सांगा आणि योग्य खिशात ठेवायला सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: कवितेचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.1, C9.1A1, C9.1A2, C9.1B2

**क्रिया:** फळे कवितेचे कार्ड मुलांना दाखवा. हावभाव आणि तालासुरात मुलांना कविता म्हणून दाखवा. मुलांना एकत्रितपणे कविता म्हणायला प्रोत्साहित करा. त्यांना चित्रात दिसत असलेल्या पात्रांबद्दल प्रश्न विचारा.

# आठवडा ३३

## सोमवार

**संसाधन: ध्वनी पेटी**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.3, C2.3A 2, C2.3B1

**क्रिया:** ध्वनी पेटीच्या साहाय्याने आवाजांचे विविध आकृतिबंध वाजवा. मुलांना समान आकृतिबंध वाजवायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** कलर ऑब्जेक्ट कार्ड दोन रंगांच्या जोडीमध्ये ठेवा. मुलांना जुळणाऱ्या रंगांच्या जोड्या बनवायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** प्लॅस्टिकच्या रिकाम्या बाटल्या किंवा कागदाचे ग्लास जमिनीवर लावा. मुलांना बॉल मारून त्या पडायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: गोष्टीचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना हत्ती आणि उंदीर गोष्टीचे कार्ड दाखवून कार्डांवरील गोष्ट वाचून दाखवा. त्यानंतर मुलांना कार्ड, गोष्टीतील घटनांच्या क्रमाने मांडण्यास सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: मासे पकडायचा खेळ**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.8A1, C8.8A2, C2.1B2

**क्रिया:** मासे एका पिशवीत ठेवा. मुलांना फक्त स्पर्शाच्या साहाय्याने समान आकाराचे मासे शोधायला सांगा.

# आठवडा ३४

## सोमवार

**संसाधन: अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1, C2.1A2

**क्रिया:** मुलांना कोणताही एक रंग सांगा आणि त्या रंगाची अक्षरे निवडून मॅटवर चिन्हांकित करायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: कवितेचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** मुलांना आईस्क्रीमच्या रंगीत काड्या द्या. फळांची नावे सांगा आणि त्याच रंगाची काडी दाखवायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2, C8.2A, C8.8A1

**क्रिया:** फळ्यावर ३x३ ची चौकट काढा. चौकटीच्या प्रत्येक भागात वेगवेगळ्या रंगांचे ठिपके काढा. मुलांना तसाच आकृतिबंध मण्यांच्या साहाय्याने काढायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.3A, C8.3B

**क्रिया:** मुलांना मोजणीची ऑब्जेक्ट कार्ड द्या आणि त्यांना समान संख्येचे संच तयार करण्यास सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.8A3, C8.8B4, C8.8C3

**क्रिया:** फळ्यावर विविध आकारांचा कॅटरपिलर काढा. मुलांजवळील विविध आकार चिकटवून त्यांना ती आकृती पूर्ण करायला सांगा.

# आठवडा ३५

**सोमवार**

**संसाधन: संख्या रोल आणि कव्हर मॅट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5B, C8.5C

**क्रिया:** जादुई पिटाऱ्यामधील ऑब्जेक्ट मोजणी कार्ड वापरा. मुलांना कोणतेही कार्ड उचलण्यास सांगा आणि त्या कार्डावरील वस्तूंची संख्या मोजायला सांगा. ती संख्या मुलांना मॅटवर चिन्हांकित करायला सांगा. हा खेळ मुलांचा गट बनवून देखील खेळला जाऊ शकतो. गटातील प्रत्येक मुलाला एकानंतर एक कार्ड निवडायची संधी द्या.

**मंगळवार**

**संसाधन: चित्र चर्चा कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना बाजाराचे चित्र चर्चा कार्ड दाखवा आणि कार्डच्या मागील बाजूस दिलेले प्रश्न विचारा.

**बुधवार**

**संसाधन: क्रिया कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.2A1, C3.2A2

**क्रिया:** जमिनीवर दिशा दाखवणारे बाण काढा. प्रत्येक बाणाच्या शेवटी क्रिया कार्ड ठेवा. मुलांना बाणाच्या दिशेने उड्या मारत जाऊन कार्डांवरील कृती करायला सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3B1, C8.3B5, C8.4A

**क्रिया:** मुलांना कोड्यातील अंक असलेले कोणतेही ५ भाग द्या आणि त्यांना उतरत्या क्रमाने मांडण्यास सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: हुला हूप**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** ४ ते ५ मुलांचे गट बनवा. त्यांना एका रांगेत उभे राहण्यास सांगा. पहिले मूल हुलाहूपमधून जाईल व हुलाहूप खाली ठेवेल. शेवटी असलेले मूल मागून पुढे पहिल्या स्थानावर येऊन तीच कृती करेल. अशा तऱ्हेने सर्व मुले शर्यत पूर्ण करतील.

# आठवडा ३६

## सोमवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C7.1A, C8.1C

**क्रिया:** कप्प्यांच्या बोर्डवर फळे आणि भाज्या अशी लेबले लावा. मुलांना ऑब्जेक्ट कार्ड वेगवेगळे करण्यास सांगा आणि संबंधित कप्प्यात ठेवायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2A3, C8.2B3, C4.5B2

**क्रिया:** मुलांना आकार वेगवेगळ्या जागेवर ठेवण्यास सांगा, जसे की लाल चौकोन खुर्चीवर ठेवा किंवा हिरवा त्रिकोण टेबलाखाली ठेवा.

## बुधवार

**संसाधन: ट्रेझर हंट**

**अध्ययन निष्पत्ती:** C4.4A1, C4.4B1, C4.5B2, C4.5B3

**क्रिया:** प्रत्येक मुलाला समान नाणी वाटा. फासे टाकायला सांगा. फास्यावर असलेल्या संख्येइतक्या घरांनी सोंगटी पुढे न्या. ज्या घरात सोंगटी पोहोचेल तिथे दिलेल्या सूचनेनुसार मुलांना नाणी दयावी किंवा घ्यावी लागतील.

## गुरुवार

**संसाधन: मोजणीचे मणी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.7A, C8.7B

**क्रिया:** मुलांना दिलेले मणी २ समान गटात विभागण्यास सांगा.

## शुक्रवार

**संसाधन: गोष्टीचे कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** हत्ती आणि उंदीर कार्ड घ्या आणि कार्डची मागील बाजूस जिथे मजकूर असेल तो भाग मुलांना दाखवा. लहान वयोगटातील मुलांना वेगवेगळी अक्षर सांगा आणि गोष्टीच्या मजकूरात ती अक्षर शोधायला सांगा. मोठ्या वयोगटातील मुलांना दोन ते तीन-अक्षरी शब्द शोधायला सांगा.

# आठवडा ३७

**सोमवार**

**संसाधन: शब्द कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** मुलांना शब्द कार्डवर दिलेल्या चित्राचे नाव अर्धवट बनवून दया. मुलांना गाळलेली अक्षरे लावून शब्द पूर्ण करायला सांगा.

**मंगळवार**

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2

**क्रिया:** मुलांना दोन गटात विभाजित करा. चेंडू मध्यभागी ठेवा. दोन्ही गटातील एक एक मूल एका वेळी येईल आणि चेंडू घेण्याचा प्रयत्न करेल.

**बुधवार**

**संसाधन: टच कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.5A, C2.5B, IL1.1

**क्रिया:** वेगवेगळ्या वस्तू मुलांसमोर ठेवा. मुलांना त्या वस्तूंना स्पर्श करून ज्या वस्तू मऊ वाटतात त्यांच्यासाठी सॉफ्ट कार्ड आणि खडबडीत वाटणाऱ्या वस्तूंसाठी रफ कार्ड दाखवायला सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.1, C8.8A1, C8.8A2

**क्रिया:** फळ्यावर ५ पर्यंतची कोणतीही संख्या आणि आकार यांचे संयोजन लिहा. मुलांना त्या आकाराचे दिलेले प्रमाण दाखवायला सांगा. उदा. ३ - O: तर मूल तीन वर्तुळे दाखवेल.

**शुक्रवार**

**संसाधन: अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** मुलांना अक्षरे वितरित करा. वेगवेगळ्या वस्तू किंवा व्यक्तींची नावे सांगा. त्या नावाचे अक्षर ज्या मुलांकडे असेल त्यांना ते अक्षर दाखवायला सांगा.

# आठवडा ३८

## सोमवार

**संसाधन: आईस्क्रीमच्या काड्या**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.6A, C8.6B2, C8.6C2

**क्रिया:** मुलांना काड्या द्या आणि मोजायला सांगा. त्यांना ठराविक संख्येच्या काड्या बाजूला काढून उरलेल्या काड्या पुन्हा मोजायला सांगा.

## मंगळवार

**संसाधन: अंक कोडी**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.3A, C8.3B, C8.5C, C8.6B

**क्रिया:** मुलांना कोणतेही दोन डॉट कार्ड द्या. मुलांना दोन्ही कार्डांवरील डॉट मोजून एकूण किती डॉट आहेत याचे उत्तर दयायला सांगा.

## बुधवार

**संसाधन: कप्प्यांचा बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.3B

**क्रिया:** मुलांना कोणतेही ऑब्जेक्ट कार्ड निवडण्यास सांगा आणि कार्डवरील वस्तूचे नाव वापरून ३ ते ४ शब्दांचे छोटे वाक्य बोलायला सांगा.

## गुरुवार

**संसाधन: पेग बॉक्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C

**क्रिया:** फळ्यावर एक संख्या लिहा आणि मुलांना तितके पेग मोजून बॉक्स वरील छिद्रांमध्ये घालायला सांगा. ही क्रिया जादुई पिटाऱ्यातील मोजणीचे वस्तू कार्ड वापरून देखील केली जाऊ शकते.

## शुक्रवार

**संसाधन: चित्र चर्चा कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.5B, C9.5C

**क्रिया:** मुलांना बाजाराचे चित्र चर्चा कार्ड दाखवा. चित्रातील विविध सजीव आणि निर्जीव वस्तू दर्शवा. मुलांना त्या वस्तू ओळखण्यास सांगा आणि त्यांची नावे विचारा.

# आठवडा ३९

**सोमवार**

**संसाधन: चित्र चर्चा कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.3B

**क्रिया:** चित्रातील विशिष्ट रंगाच्या कोणत्याही वस्तूकडे निर्देश करा आणि मुलांना त्याच रंगाच्या इतर वस्तूंची नावे सांगण्यास सांगा. उदा. झाडाकडे निर्देश करा आणि मुले इतर हिरव्या वस्तूंची नावे सांगू शकतात जसे की पाने, पोपट, पेरू इ.

**मंगळवार**

**संसाधन: ध्वनी पेटी**

**अध्ययन निष्पत्ती:** C2.3, C2.3A 2, C2.3B1

**क्रिया:** मुलांना ध्वनी पेटी वाजवायला सांगा. विविध आवाजांचे संयोजन करून त्यांना वेगवेगळ्या स्वरमालिका बनविण्यास सांगा.

**बुधवार**

**संसाधन: ट्रेझर हंट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.8A1, C8.8A2, C3.2, C3.4, C3.4C1

**क्रिया:** वेगवेगळ्या रंगांचे काउंटर काही अंतरावर ठेवा. मुलांना काउंटर द्या. त्याच्याशी जुळणारे रंगीत काउंटर ठेवायला सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: इमोशन बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C4.2, C4.2A2, C4.2B1A, C4.2B1B

**क्रिया:** इमोशन बोर्डवर वेगवेगळे हावभाव बनवा आणि मुलांना त्या भावनांबद्दल सांगा. मुलांना त्यांच्या चेहऱ्यावर तसे भाव करायला सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: शब्द कार्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B1

**क्रिया:** चित्राच्या नावाच्या शब्दातील अक्षरांना उलट सुलट लावा. मुलांना शब्द ओळखण्यास सांगा आणि उलट सुलट अक्षरांना क्रमवार लावून शब्द बनवायला सांगा.

# आठवडा ४०

**सोमवार**

**संसाधन: अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स**

**अध्ययन निष्पत्ती:** C10.3, C10.3A1, C10.3B

**क्रिया:** मुलांना तीन वेगवेगळी अक्षरे सांगा जसे ख, घ, च. अक्षरांना त्याच क्रमाने मॅटवर शोधून चिन्हांकित करायला सांगा.

**मंगळवार**

**संसाधन: लेसिंग बोर्ड**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.3A, C3.3B, C3.3C

**क्रिया:** मुलांना बोर्डवरील छिद्रांमधून लेस ओवून विविध आकृतिबंध तयार करण्यास सांगा.

**बुधवार**

**संसाधन: आकार किट**

**अध्ययन निष्पत्ती:** C8.2, C8.2A, C7.2B2

**क्रिया:** कोणतेही ३ आकार आणि ३ क्रिया यांचे संयोजन करा. नंतर आकार दाखवा आणि मुलांना संबंधित क्रिया करण्यास सांगा.

**गुरुवार**

**संसाधन: चेंडू**

**अध्ययन निष्पत्ती:** C3.1, C3.1A1, C3.1B1, C3.1B2


**क्रिया:** मुलांच्या जोड्या बनवा. त्यांना हात न लावता डोक्याच्या साहाय्याने बॉल धरून अंतिम रेषेपर्यंत जायला सांगा.

**शुक्रवार**

**संसाधन: प्राण्यांच्या हेडबँड**

**अध्ययन निष्पत्ती:** C9.3, C9.3A, C9.3B

**क्रिया:** प्राण्यांचे हेडबँड घाला आणि मुलांना त्या प्राण्याबद्दल प्रश्न विचारा जसे की तो कुठे राहतो, काय खातो इ.



आकार किट



टच कार्ड



लेसिंग बोर्ड



इमोशन बोर्ड



मासे पकडायचा खेळ



मोजणीचे मणी



पेग बॉक्स



चेंडू



पटावरील खेळ




आईस्क्रीमच्या काड्या



चित्र कोडी




कठपुतळी



रंग कोडी



बाहुली




अंक कोडी



कप्प्यांचा बोर्ड



क्रिया कार्ड



ध्वनी पेटी



प्राण्यांच्या कठपुतळ्या




गोष्टीचे कार्ड



कवितेचे कार्ड



रोल आणि कव्हर मॅट्स



प्राण्यांचे हेडबँड




हुला हूप



चित्र चर्चा कार्ड




शब्द कार्ड




ज्ञानदीप मिटवी अज्ञान
समग्र शिक्षा
सन २०२३-२४